
आधुनिक विचारांचे

# वर्तमान

बीड । मंगळवार, २५ मे २०२१ । वर्ष : ३ | आपले वृत्तपत्र, आपला आवाज | अंक : ३१ । पाने : ४ । मूल्य २ ₹



जगाला शांतीचा संदेश देणारे तथागत गौतम बुद्ध पौर्णिमेनिमित्त त्यांच्या विचारांना वंदन!
: संपादक

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क
9423209823
मुख्यालय : 'शिवगड' २३, मुख्य रस्ता, मस्जिद चौक, माजलगाव जि.बीड

# तिसरी लाट रोखण्यासाठी टास्क फोर्स

## मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचे प्रयत्न; प्रशासनाला दिले निर्देश

प्रतिनिधी

**मुंबई: राज्यात कोरोना संसर्गाची दुसरी लाट ओसरत असताना तिसऱ्या लाटेची शक्यता वर्तवण्यात येत आहे. तिसरी लाट आलीच तर त्यात लहान मुलांना सर्वाधिक धोका असेल असे सांगितले जात आहे. या पार्श्वभूमीवर राज्यात बालरोग तज्ज्ञांचा टास्कफोर्स स्थापन करण्यात आला आहे. या टास्क फोर्सच्या मार्गदर्शनपर कार्यक्रमात बोलताना मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी लॉकडाऊनबाबत महत्त्वाचे विधान केले आहे. लॉकडाऊनच्या निर्णयात सरकारची साथ देत असलेल्या नागरिकांचेही मुख्यमंत्र्यांनी आभार मानले आहेत. राज्यात कोरोनाची साखळी तोडण्यासाठी १ जूनपर्यंत लॉकडाऊन लावण्यात आला असून त्यापुढे लॉकडाऊन वाढवला जाणार की नाही याबाबत अनेक तर्क लावले असताना मुख्यमंत्र्यांनी केलेले विधान अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहे.**





'लॉकडाऊन लावण्याचा निर्णय अत्यंत कठोर आणि कटू असतो. आपल्या हालचालींवर बंधने टाकणे आणि तीसुद्धा रोजीरोटीवर बंधने टाकणे याच्यासारखा कठोर निर्णय किंवा शिक्षा असूच शकत नाही. ही सुरुवात कुणी करायची, असा एक प्रश्न होता. कोरोना संसर्ग उच्चांक गाठत असताना देशभरात भीतीचे वातावरण होते पण मी ठामपणे लॉकडाऊनचा निर्णय घेतला. राज्याच्या हितासाठीच मी हे पाऊल उचलले. राज्याच्या हितासाठी कटूपणा घ्यायची माझी तयारी आहे, असे मी नेहमी सांगतो आणि त्यानुसार मला हा निर्णय घ्यावा लागला. हा निर्णय घेतल्यानंतर नागरिकांनी खरोखरच त्याला मनापासून सहकार्य केले. त्यातूनच आज कोरोनावर नियंत्रण मिळवता आले आहे पण अजून या लढाईत आपल्याला यश मिळालेले नाही. हे यश मिळेपर्यंत आपली लढाई सुरूच राहणार आहे', असे नमूद करत मुख्यमंत्री ठाकरे यांनी लॉकडाऊनबाबत मोठे संकेत दिले.

गेल्यावर्षी याच दिवसांमध्ये कोरोनाने हातपाय पसरायला सुरुवात केली होती. तेव्हा वेगाने पावले टाकणारे महाराष्ट्र हे कदाचित देशातील पहिले राज्य होते. हॉस्पिटल्स कमी पडतील, बेड्स कमी पडतील हा विचार करून आपण जम्बो फॅसिलीटी तयार केल्या. काही फिल्ड हॉस्पिटल्स उभी केली. त्यासोबतच तज्ज्ञ डॉक्टरांचा टास्क फोर्स आपण तयार केला. यात मी केवळ निमित्तमात्र आहे.

आज कोरोनावर नियंत्रण आल्याचे जे काही चित्र आपल्याला दिसतेय त्याचे सगळे श्रेय मला वेळोवेळी मार्गदर्शन करणारे तज्ज्ञ डॉक्टर्स, अहोरात्र राबत असलेले आरोग्य कर्मचारी, परिचारिका, पोलीस, स्वयंसेवी संस्था, शिवसेनेसह सर्व पक्षांचे कार्यकर्ते आणि विशेष म्हणजे नागरिकाना जाते, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री घरी बसून काम करतात, या विरोधकांच्या टीकेला उत्तर देताना कोरोनावर टीमवर्कमुळे कसे नियंत्रण मिळवले यावर मुख्यमंत्र्यांनी प्रकाश टाकला. 'एकटा कॅप्टन काहीच करू शकत नाही. त्याची टीमही तेवढीच मजबूत असणे आवश्यक असते आणि माझी टीम मजबूत आणि कुशल आहे. मला नक्कीच त्याचा सार्थ अभिमान आहे, असे मुख्यमंत्री म्हणाले.

### 'लहान मुलांना बेसावध ठेवू नका'

कोविड विरुद्धच्या लढ्यात डॉक्टर्सना मोठ्या प्रमाणावर सहभागी करून घेण्याच्या मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या संकल्पनेस वाढता प्रतिसाद असून रविवारी या उपक्रमाच्या दुसऱ्या टप्प्यात राज्यातील ६ हजार ३०० बाल रोग तज्ज्ञांना राज्य शासनाच्या कोविड विषयक बाल रोग तज्ज्ञ टास्क फोर्सने वैद्यकीय उपचाराबाबत मार्गदर्शन केले. मुलांमध्ये कोविड आणि कोविडशी संबंधित मानसिक व भावनिक आरोग्याकडे लक्ष देण्यावर देखील चर्चा झाली. लहान मुलांमधील संसर्गाबाबत बेसावध राहू नका, वेळीच डॉक्टरला दाखवा, कोविडविरुद्धची आपली एकजुटीची साखळी मजबूत ठेवून या विषाणूला पराभूत करू, असे यावेळी मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

## बाल रोग तज्ञांचा टास्क फोर्स नियुक्त

बीड : पुढील सहा महिन्यात कोरोनाची तिसरी लाट येण्याची भीती वैज्ञानिकांनी व्यक्त केली आहे. या लाटेचा सर्वाधिक धोका बालकांना असल्याचा अंदाज वर्तविण्यात आलेला आहे. याच पार्श्वभूमीवर जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी रवींद्र जगताप यांच्या आदेशानुसार बाल रोग तज्ञांचा टास्क फोर्स नियुक्त करण्यात आला आहे. याबाबतचे आदेश शनिवारी (दि.२२) जारी केले आहेत.

टास्क फोर्सचे अध्यक्ष अंबाजोगाईच्या बालरोग विभागाचे प्रमुख डॉ.संभाजी चाटे तर सदस्य सचिव म्हणून जिल्हा रुग्णालयातील बाल रोग तज्ञ (वर्ग १) डॉ.राम देशपांडे हे असतील. तसेच आयएमएचे अध्यक्ष डॉ.अनुराग पांगरेकर हे समन्वयक असणार आहेत.

सदस्यांमध्ये नेकनूरच्या कुटीर रुग्णालयाचे बाल रोग तज्ञ डॉ.सचिन आंधळकर, जिल्हा रुग्णालयातील बालरोग तज्ञ डॉ.शंकर काशीद, स्वाराती रुग्णालयातील बाल रोग तज्ञ डॉ.रमेश लोमटे यांचा समावेश असणार आहे. टास्क फोर्स बालकांमधील कोरोना कसा रोखावा? कोरोनाग्रस्त बालकांच्या उपचार, त्याच्या पद्धतीबाबत आयसीएमआरच्या मार्गदर्शक तत्वानुसार मार्गदर्शन करणार आहे, असे आदेशात म्हटले आहे. सदरील आदेशाची आवाज्ञा झाल्यास फौजदारी कारवाई करण्यात येईल असे जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी रवींद्र जगताप यांनी आदेशात म्हटले आहे.

## फास्टट्रॅकन्यूज



### 'म्यूकरमायकॉसिस संसर्गजन्य नाही'

नवी दिल्ली : म्यूकरमायकॉसिस हा कोविड-१९ संसर्गावर उपचार घेऊन रोगमुक्त झालेल्या किंवा सध्या उपचार घेत असलेल्या रुग्णांमध्ये आढळणारा सर्वसामान्य बुरशीजन्य आजार आहे. या आजाराने बाधित व्यक्तींची संख्या वाढताना दिसत असली तरी हा संसर्गजन्य, म्हणजे कोविड-१९ सारखा एका व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीमध्ये पसरणारा आजार नाही. नवी दिल्ली येथील एम्स अर्थात अखिल भारतीय वैद्यकीय विज्ञान संस्थेचे संचालक डॉ.रणदीप गुलेरिया यांनी रविवारी पत्र सूचना कार्यालयाच्या नवी दिल्ली येथील राष्ट्रीय माध्यम केंद्रात माध्यम प्रतिनिधींना संबोधित करताना ही माहिती दिली.

### डोंगरपट्ट्यातील रांगडा नेता हरपला; महादेव बडे यांचे निधन



धारूर : धारूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती तथा माजी जिल्हा परिषद सदस्य महादेव बडे (वय ६०) यांचे रविवारी पहाटे औरंगाबाद येथे खासगी रुग्णालयात उपचार सुरू असताना निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. दिवंगत गोपीनाथराव मुंडे यांचे ते कट्टर समर्थक होते. बडे परिवारावर कोसळलेल्या दुःखात वर्तमान माध्यम समूह सहभागी आहे.

### लसीकरणाबाबत जिल्हा प्रशासनाची नवी नियमावली

बीड :जिल्ह्यात सध्या ४५ वर्षे वय व त्यापेक्षा जास्त वयाच्या नागरिकांचे लसीकरण सुरू आहे. लसीकरण केंद्रावर विनाकारण जास्त गर्दी होऊ नये व लसीकरण प्रक्रियेमध्ये सुसूत्रता येण्यासाठी नागरिकांना http://ezee. live/Beed-Covid19-Registration या लिंकवर नोंदणी करून टोकन नंबर प्राप्त करून घ्यावा व लसीकरणाला येणेबाबत एसएमएस अथवा वाट्सॲपर संदेश आल्यावरच लसीकरण करण्यासाठी यावे असे आवाहन करण्यात येत आहे. १८ ते ४४ वयोगटातील नागरिकांचे लसीकरण सध्या राज्य शासनाच्या सूचनेनुसार सध्या स्थगित करण्यात आलेले आहे. या वयोगटातील व्यक्तींचे लसीकरण होणार असल्याबाबत बातम्या व्हायरल झालेल्या आहेत, परंतु याबाबत अधिकृत आदेश आलेला नाही.

### ओरल म्युकरमायकोसीसचा रूग्ण माजलगावात आढळला

माजलगाव : कोरोना आजाराने आगोदरच समस्त मानव जात ही अडचणीत सापडलेली आहे. त्यातच म्युकरमायकोसीस या काळ्या बुरशीच्या आजाराने डोकं वर काढत अनेकांचे प्राण घेतलेले आहेत. त्यात आता ओरल म्युकरमायकोसीस या आजाराने देखील एन्ट्री घेतल्याचे येथील स्मित दातांचा दवाखान्यामध्ये आढळून आलेल्या एका रूग्णामुळे दिसून आले असून डॉ.सचिन देशमुख यांनी या आजाराने ग्रस्त एका रूग्णाचे निदान केले. तसेच योग्य काळजी घेतल्यास या आजारापासून सुटका मिळवता येते असे देखील डॉ.देशमुख यांनी सांगितले आहे. ओरल म्युकरमायकोसीस आजाराचा प्रथम रुग्ण माजलगाव येथे शनिवारी आढळून आला. माजलगावातील स्मित दातांचा दवाखान्यात डॉ.सचिन देशमुख यांनी या बुरशीजन्य आजाराने ग्रस्त असलेल्या रूग्णाचे निदान केले.

पल्स हॉस्पिटल
डॉ.तौसीफ वासेफोद्दीन शेख M.B.B.S.
जनरल फिजिशियन Reg.No.:2019/05/3848
उपलब्ध सुविधा व उपचार
- बाह्यरुग्ण विभाग
- आंतर रुग्णविभाग
- दुर्घटना विभाग
- गर्भवती महिलांची तपासणी
- Fetal Doppler (गर्भातील बाळाचे हृदयाचे ठोके मोजण्याची मशिन)
- बालरोग तपासणी
- ई.सी.जी.
- ऑक्सीजन
- ग्लुकोमीटर
- नेब्युलायजर
- हृदयरोग व रक्तदाब
- मधुमेह
- दमा व अस्थमा, ॲलर्जी
- मेंदुविकार
- विषबाधा व सर्पदंश
- थायरॉईड ग्रंथीचे विकार
- कावीळ व पोटाचे विकार
- रक्त विकार
- त्वचा व गुप्तरोग
- लठ्ठपणा (Obesity) क्लिनिक
- संपूर्ण बॉडी चेकअप
वेलनेस मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स
मेन रोड, पात्रुड ता.माजलगाव जि.बीड । मो.7758989292

अलकाश्री हॉस्पीटल & क्रिटीकेअर सेंटर (ICU)
24 तास सेवा
डॉ.विजय श्रीराम खळगे M.B.B.S., M.D.Medicine
डॉ.प्रभा विजय खळगे M.B.B.S.
उपलब्ध सुविधा
- मेडीसीन व अतिदक्षता विभाग
- दमा व श्वासविकारांवर
- (कोविड) निदान व उपचार
- उच्च रक्तदाव निदान व उपचार
- मधुमेह क्लिनीक
- थायरॉईड क्लिनीक
- ह्दयविकार निदान व उपचार
- फिट्स व पॅरेलिसिस
- निदान व उपचार
- सर्पदंश व विशबाधा
- निदान व उपचार
- २४ तास अत्याधुनिक ICU
खॉन कॉम्प्लेक्स, सुंदरराव सोळंके महाविद्यालयाच्या बाजुला, गढी रोड, माजलगाव

# शासकीय कोविड सेंटरमध्ये स्वच्छतेचे तीनतेरा

## केसापुरी कॅम्पमधील प्रकार; जागोजागी कचऱ्याचे ढीग; रूग्णांचे बेहाल

प्रतिनिधी

माजलगाव : तालुक्यातील केसापुरी कॅम्प येथे सुरू असलेल्या शासकीय कोविड सेंटरमध्ये मागील पाच दिवसांपासून स्वच्छताच न केल्याने जागोजागी कचऱ्याचे ढिगारे साचलेले दिसून येत आहेत. यामुळे कोविड सेंटरमध्ये सर्वत्र दुर्गंधी पसरली आहे. नगरपालिकेचे याकडे दुर्लक्ष होताना दिसत आहे. दरम्यान, जागोजागी कचऱ्याचे ढीग साचल्याने स्वच्छतेचे तीनतेरा वाजले आहेत. या प्रकारामुळे रूग्णांचे मात्र बेहाल होताना दिसत आहेत. नगरपालिका प्रशासनाने लक्ष द्यावे, अशी मागणी होत आहे.



ज्या कोरोना रूग्णांमध्ये कोरोनाची कमी लागण आहे, अशा रूग्णांवर येथील शासकीय कोविड सेंटरमध्ये व्यवस्था करण्यात आली आहे. येथे ४ ते ५ ठिकाणी या रूग्णांची व्यवस्था करण्यात आली आहे. सध्या या ठिकाणी जवळपास ३०० रूग्ण उपचार घेत आहेत. या ठिकाणी आतमधील स्वच्छता ही आरोग्य विभागाकडून केली जाते. या ठिकाणची सर्व घाण वेगवेगळ्या ठिकाणी ठेवण्यात येते. ही घाण उचलण्याचे काम हे माजलगाव नगरपालिकेच्या स्वच्छता विभागाकडून केले जाते. नगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांकडून मागील पाच दिवसांपासून या ठिकाणचा कचरा उचलण्यात आला नाही. यामुळे येथे घाणीचे साम्राज्य पसरले आहे, तर डासांचा प्रादुर्भाव देखील वाढला आहे. अगोदर कोरोना पॉझिटिव्ह रूग्ण परेशान असताना या घाणीच्या दुर्गंधीमुळे आणखी काही आजार आपल्या मागे लागणार तर नाही ना, अशी भीती रूग्णांमध्ये पसरली आहे. याबाबत आरोग्य विभागाच्या कर्मचाऱ्यांना अनेकांनी बोलण्याचा प्रयत्न केला असता ते म्हणतात, हे आमचे काम नसून नगरपालिकेचे काम असल्याचे सांगतात. यामुळे याबाबत बोलायचे कोणाला, असा प्रश्न अनेकांना पडत आहे.

## संपादकीय

# 'तौक्ते'मुळे वित्तीय हानी

नैसर्गिक आपत्तीमध्ये जनसामान्यांसह सरकारची आर्थिक घडी विस्कटते. अशा वेळी मोठ्या हिंमतीने कंबर कसने काळाची गरज आहे. चक्रीवादळे आता नियमित झाली आहेत. वर्षातून दोन-तीन वेळा ती वेगवेगळ्या भागांत थैमान घालतात. पूर्वीच्या तुलनेत वादळाची पूर्वसूचना बरीच आधी मिळत असल्याने जीवितहानी रोखण्यात यश येत असले तरी, वादळामुळे प्रचंड वित्तीय हानी होते हेही तितकेच खरं! वारंवार येणारी ही वादळे बराच आघात करून जातात. वादळग्रस्तांना विमा आणि सरकारी मदत मिळत असली, तरी नुकसानाच्या तुलनेत अत्यल्प असल्याने शेतकरी कोलमडून पडतो. केवळ शेतीचंच नाही तर घरांचे, मच्छीमारांच्या नौकांचे, फळबागांचे नुकसानही भरून येणारे नसते. प्रचंड वेगाने घोंघावत येणाऱ्या तौक्ते'ने महाराष्ट्रासह गुजरातचंही मोठे नुकसान झाले. कोरोनाच्या दुसऱ्या लाटेचा सामना करणाऱ्या भारताच्या आर्थिक नुकसानात तौक्ते चक्रीवादळाच्या तडाख्यामुळे अधिकच भर पडली. या वादळामुळे बेरोजगारी, वेतनकपातीचे संकट अधिक बळावू शकते. तौक्ते चक्रीवादळाने अनपेक्षितपणे दिशा बदलल्यामुळे महाराष्ट्राचे मोठे नुकसान टळले. हे वादळ महाराष्ट्राच्या पश्चिम किनारपट्टीला स्पर्श करून गुजरातच्या दिशेने गेले. मात्र वादळाच्या प्रभावामुळे झालेला प्रचंड पाऊस आणि वेगाने वाहणाऱ्या वाऱ्यामुळे बरेच नुकसान सहन करावे लागले. दरम्यान, वादळाची पूर्वसूचना आधीच देण्यात आल्यामुळे लोकांना सुरक्षित स्थळी हलवण्याचे काम वेगाने सुरू करण्यात आले आणि रत्नागिरी, सिंधुदुर्ग आणि रायगडमधल्या जवळपास तीस हजार लोकांना सुरक्षित स्थळी हलवण्यात आले. यामुळे जीवितहानी टाळता आली. महाराष्ट्राच्या किनारी पट्ट्यात सुमारे ऐंशी ते शंभर किलोमीटर वेगाने वाहणाऱ्या वाऱ्यामुळे फळबागा कोलमडून पडल्या. घरांची कौलं उडाली. विजेचे खांब उन्मळून पडले. मागच्या निसर्ग' वादळाने तर खंडित झालेला वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी जवळजवळ आठवडा लागला होता. कोकणातले अनेक रस्ते, झाडे कोसळल्यामुळे बंद झाल्यामुळे आताही राज्याच्या अन्य भागातून अतिरिक्त वीज तांत्रिकींना पाठवून वीजपुरवठा सुरळीत करण्याचे मोठे आव्हान समोर उभे ठाकले. तौक्ते चक्रीवादळाने कोकणाचे मोठे नुकसान केले असून सिंधुदुर्गमध्ये, तर शेतकऱ्यांचे कंबरडंमेच मोडले. इथल्या ३३७५ हेक्टर फळबागा भुईसपाट झाल्या असून १७२ गावांमधल्या १०५९ शेतकऱ्यांचं प्रचंड नुकसान झालं आहे. यापैकी १११०.४२ हेक्टर आंब्याच्या बागा आहेत. २७७.६१ हेक्टर क्षेत्रातल्या बागांमधले आंबे पडले, तर ८३२ हेक्टर क्षेत्रातल्या आंब्याच्या झाडांच्या फांद्या मोडून पडल्या. वादळात अशा बागा उन्मळून पडल्या की शेतकऱ्यांना उभे राहायला किमान दहा वर्ष लागतात. सर्वाकडेच पीक विमा नसतो. त्यात सरकारची नुकसानभरपाई हेक्टरी २५ हजार रुपयांपर्यंत असते. त्यातून जमिनीची मशागत आणि रोपांचाही खर्च भागत नाही. कोकणपट्ट्यातला शेतकरी काही वर्ष मागे फेकला गेल्यास आश्चर्य वाटायला नको. या वादळाचा फटका राज्यातल्या ६३४९ पेक्षा अधिक गावांना बसला असून अकरा लोकांनी जीव गमावला. मुंबईत ४७९ ठिकाणी झाडं पडण्याच्या घटना घडल्या. यामुळे शेकडो वाहनांचं नुकसान झाले. इतकेच नाही, तर वादळग्रस्त भागातला वीजपुरवठाही मोठ्या प्रमाणावर खंडित झाला. राज्याचे ऊर्जामंत्री नितीन राऊत यांच्या माहितीनुसार वादळामुळे ठाणे, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड, पुणे, पालघर आणि कोल्हापूरमधल्या जवळपास १८८ विद्युत उपकेंद्रांचे मोठे नुकसान झाले. वादळामुळे प्रभावित गावांमधल्या वीजपुरवठ्यावरही परिणाम झाला. तौक्तेमुळे झालेल्या नुकसानाचा आढावा घेऊन भरपाई केली जाणं आवश्यक आहे. पालघर जिल्ह्याला या चक्रीवादळाचा मोठा फटका बसला आहे. जिल्हा प्रशासनाच्या प्राथमिक अंदाजात जिल्ह्यात पन्नास झाडे पडल्याची तसेच ३३७ घरांवरील छप्पर उडाल्याची माहिती समोर आली आहे. मात्र प्रत्यक्षात हा आकडा कितीतरी मोठा असण्याची शक्यता आहे. त्यामुळे पडलेली झाडे दूर करण्याचे तसंमेच छप्पर दुरुस्तीचे काम वेगाने हाती घेणे आवश्यक आहे. असे असले तरी कारागीर आणि कामगारांच्या कमतरतेमुळे या कामाचा वेग मंदावून जनजीवन सुरळीत होण्यास वेळ लागू शकतो. पालघर तालुक्यात एक हजारपेक्षा अधिक झाडे पडली आहेत. झाडे तोडण्याच्या कामासाठी सात ते दहा कुशल कारागीर उपलब्ध असून बेकरी आणि वखारींना लाकडे देण्याच्या लोकांकडे काम करणारे कामगार टाळेबंदीच्या काळात मूळ गावी गेले असल्यामुळे अडचणीत भरच पडली आहे.

# बळीराजा आजही पारतंत्र्यात

**आपण ज्या महात्म्यांचा आदर करतो, त्यांची पुस्तके वाचत नाहीत, त्यांच्या वचनांचे आचरण करीत नाहीत. ज्या ग्रंथांबद्द्ल श्रद्धाभाव असतो, ती आपण वाचलेली नसतात. अनेक धर्माच्या अनुयायांमध्ये त्यांच्या धर्मग्रंथांचे अध्ययन केलेले अभावानेच दिसून येतात. पण त्या महात्म्याबद्द्ल किंवा धर्मग्रंथाबद्दल कोणी ब्र काढला तर त्यांचे अनुयायी अक्षरश: तुटून पडतात. धर्मग्रंथ आणि महात्मे यांच्या बाबत जी विसंगती दिसून येते, तशीच विसंगती भारतीय राज्यघटनेबद्दल देखील दिसू लागली आहे. घटना आणि कायद्याचे काही कळत नसले तरी खबरदार' वगैरे भाषा वापरली जाते. या श्रद्धाभावाचा अनेकजण गैरफायदा घेतात.**

आज-काल

**अमर हबीब**



मी एका सभेत लोकांना विचारले की, तुमच्या पैकी किती जणांनी भारतीय राज्यघटना वाचली आहे, कृपया हात वर करा.' कोणाचाच हात वर झाला नाही. मला वाटले, विचारण्यात काही चुकले असेल म्हणून लोकांच्या लक्षात आले नसेल. पुन्हा विचारले, तरी कोणीच हात वर केले नाही. मी प्रश्नात दुरुस्ती केली व विचारले की, तुमच्या पैकी किती जणांनी भारतीय राज्यघटनेचे पुस्तक पाहिले आहे? दोन जणांचे हात वर झाले. चौकशी केली तर कळले की, ते दोघे वकील आहेत आणि भारतीय राज्यघटना त्यांच्या अभ्यासक्रमात होती. ती अभ्यासक्रमात नसती तर किती जणांनी अभ्यासली असती कोणास ठाऊक?

घटना बचाव' करणार्यांची मी काही व्याख्याने ऐकली. त्यात ते घटनापीठाने तयार केलेल्या घटनेची माहिती देतात. त्याचा गुणगौरव करतात. पण मला प्रश्न पडतो की, घटनापीठाने तयार करून दिलेले संविधान आज जसेच्या तसे राहिले आहे का? त्यात काही बदल झाले नाहीत का? (१९५१ ते २० पर्यत १०४ घटनादुरुस्त्या झाल्या. त्यांनी घटनेत ३७३ बदल झाले.) हे बदल योग्य होते का? केलेल्या बदलामुळे मूळ घटना बळकट झाली का दुबळी झाली? भारतीय नागरिकांवर या घटनांदुरुस्त्यांचा काय परिणाम झाला? याच्याबद्दल ते अवाक्षार काढीत नाहीत. मूळ संविधानाचा सम्मान जरूर करू. कारण ते स्वातंत्र्य आंदोलनातील योद्ध्यांनी तयार केले, या देशाला मिळालेले ते पहिले संविधान आहे. पहिल्यांदा देशातील नागरिकांना अनेक अधिकार या घटनेने दिले. याबद्दल दुमत असण्याचे कारण नाही. पण गेल्या सत्तर वर्षात केलेल्या घटनादुरुस्त्यांनी मूळ घटनेचा श्वास कोंडला गेला, हेही सांगायला हवे की नाही? आज एवढ्या वर्षानंतर घटनेबद्दल बोलायचे असेल तर घटनादुरुस्त्यांचा आढावा घेणे अनिवार्य आहे, आणि तुम्ही तो घेत नसाल तर काही तरी असे लपवित आहात, जे कोणाच्या तरी फायद्याचे आहे. असा अर्थ काढावा लागेल. तुम्ही नव्या पिढीची दिशाभूल करीत आहात असा आरोप तुमच्यावर ठेवता येईल.

पहिली घटनादुरुस्ती

आपली घटना तयार करायला साधारणपणे तीन वर्षे लागली. २६ जानेवारी १९५०ला ती देशाने स्वीकारली. तीन वर्षे प्रदीर्घ चर्चा करून संविधान तयार करणारे घटनापीठ हेच आमचे हंगामी पार्लमेंट होते. तेंव्हा प्रौढ मतदानावर आधारित निवडणूक झालेली नाव्हती. ती काही महिन्यात होणार होती. राज्यसभा अजून अस्तित्वात आलेली



नाही. थोडे थांबा, असे अनेक मान्यवरांनी सुचवून पाहिले पण काही परिणाम झाला नाही. हंगामी संसदेने अवघ्या दीडच वर्षात म्हणजे १८ जून १९५१ रोजी पहिली घटनादुरुस्ती केली. या दुरुस्तीने आपल्या घटनेवर मोठा आघात झाला. जाणकार मानतात की, या दुरुस्तीने नवी घटनाच साकार झाली. अनुच्छेद ३१ ए व बी जोडण्यात आले. त्यानुसार नवे ९ वे परिशिष्ट तयार करण्यात आले. मूळ घटनेत आठच परिशिष्टे होती. ३१ बी मध्ये म्हटले आहे की, या ९व्या परिशिष्टात ज्या कायद्यांचा समावेश केला जाईल, ते कायदे न्यायालयाच्या कक्षेच्या बाहेर राहतील. काही कायदे न्यायालायच्या कक्षेच्या बाहेर राहतील' यासाठी पहिली घटनादुरुस्ती करण्यात आली. लोकांच्या स्वातंत्र्याची कक्षा वाढविण्यासाठी पहिली घटनादुरुस्ती झाली नाही. अनुच्छेद-३२ नुसार न्यायालयात दाद मागण्याचा अधिकार देण्यार आला आहे. त्यालाच या दुरुस्तीने निष्प्रभ करून टाकले. थोडक्यात असे की, घटनेत असे एक नवे परिशिष्ट जोडण्यात आले की, ज्यात टाकलेल्या कायद्यांच्या विरुद्ध न्यायालयात दाद मागता येणार नाही. या दुरुस्तीने संसद, कार्यसमिती व न्यायालय यांचे संतुलन बिघडवून टाकले. त्याच बरोबर या दुरुस्तीमुळे नागरीकांच्या नैसर्गिक अधिकाराचे हनन झाले. या घटनादुरुस्तीचे औचित्य आणि वैधते विषयी कायदा आणि घटनातज्ञ भाष्य करतील. मी एक कार्यकर्ता आहे. तब्बल सत्तर वर्षानंतर पाहताना मला जे काय दिसते, तेवढेच मी सांगू शकतो. परिशिष्ट ९ मध्ये आज २८४ कायदे आहेत. त्या पैकी सुमारे अडीचशे कायदे थेट शेती आणि शेतकर्यांशी निगडित आहेत. उरलेल्या पैकी बहुतेक कायद्यांचा शेती आणि शेतकऱ्यांशी संबंध येतो. असे का योगायोगाने होते? शेती आणि शेतकऱ्यांशी संबंधित कायदेच तेवढे या परिशिष्टात का आले? शेतकर्याना न्यायालयाची दारे का बंद करण्यात आली? हे काही गफलतीने झाले नसून जाणून बुजून झाले आहे, असे मला वाटते.

ही घटनादुरुस्ती करताना तत्कालीन प्रधानमंत्री पंडित जवाहरलाल नेहरू यांनी ही व्यवस्था फक्त या १३ कायद्यांसाठी केली जात आहे.' असे म्हटले होते. संसदेत जाहीर आश्वासन दिले होते. पण पंडित नेहरू यांच्या हयातीत म्हणजे १९६४ पर्यत या परिशिष्टात सुमारे ६० कायदे समाविष्ट करण्यात आले होते. पुढच्या पंतप्रधानांचे विचारायलाच नको. त्यांना आयता तयार पिंजरा मिळाला होता. शेतकर्यांचे कायदे या पिंजऱ्यात टाकायचा त्यांनी सपाटाच लावला. सीलिंग म्हणजे कमाल शेतजमीन धारणा कायदा. या कायद्यात कमाल धारणेची मर्यादा फक्त शेत जमिनीवर टाकली आहे. अन्य जमिनीवर नाही. हा कायदा शेतकरी आणि इतर व्यावसायिक यात उघड पक्षपात करतो. समान संधी, व्यावसाय स्वातंत्र्य, मालमत्तेचा अधिकार नाकारणारा हा कायदा आहे. संविधानाच्या मूळ सिद्धांताच्या विरुद्ध असूनही इतके दिवस तो कायम राहिला कारण तो परिशिष्ट-९ मध्ये टाकण्यात आला होता. त्यांच्या विरुद्ध न्यायालयात जाण्यास बंदी घालण्यात आली. परिणाम काय झाला? शेतजमिनीवर सिलिंग लावल्यामुळे कल्पक उद्योजक व व्यावसायिकांनी शेतीकडे पाठ केली. शेतकर्याच्या कंपन्या तयार होऊ शकल्या नाही, शेतीत भांडवल आटले व नवी गुंतवणूक थांबली. जमिनीचे लहान लहान तुकडे झाले. शेत जमिनींचा आकार इतका लहान झाला की, त्यावर गुजराण करणे देखील अशक्य झाले. शेवटी शेतकर्याना आत्महत्या कराव्या लागल्या. एवढे अनर्थ करणारा हा कायदा टिकून राहिला. त्याचे एकमेव कारण परिशिष्ट-९ आणि पहिली घटना दुरुस्ती हे आहे.

आवश्यक वस्तू कायदा १९५५ देखील एक घटना दुरुस्ती करूनच आला. १९७६ साली इंदिरा गांधी सरकारने तो परिशिष्ट-९ मध्ये टाकला. हा कायदा शेतीमालाचे भाव पाडण्यासाठी वापरण्यात आला. एवढेच नव्हे तर हा कायदा लायसन्स, परमीट आणि कोटा राज निर्माण करणारा आहे. सरकारी नोकरांच्या भ्रष्टाचाराची जननी आहे. या कायद्यामुळे शासन पोषित राजकीय संस्कृती तयार झाली. या कायद्यामुळे ग्रामीण भागात कारखानदारी सुरु होऊ शकली नाही. शेतकर्याना मूल्यवृद्धीचा व किसानपुत्रांना रोजगाराचा लाभ मिळू शकला नाही. व्यावसाय स्वातंत्र्यावर उघड हल्ला चढवणारा हा कायदा देखील परिशिष्ट-९ मुळेच सरकारला बिनधास्तपणे वापरता आला. घटनाकारांनी मालमत्तेचा अधिकार मुलभूत अधिकार म्हणून दिला होता. सरकारला त्याची अडचण वाटत होती. सरकारला जमीन अधिग्रहण करण्याचा निर्विघ्न अधिकार हवा होता. सीलिंग, आवश्यक वस्तू, जमीन अधिग्रहण हे तीन कायदे विषारी साप आहेत. या सापांची अनेक पिल्ले आहेत. परिशिष्ट-९ हे या विषारी सापांचे आश्रयस्थान आहे. वारूळ आणि साप असे त्यांचे नाते आहे. मुळात साप मारायचे आहेत म्हणून वारूळ उध्वस्त करायचे आहे. शेतकरीविरोधी नरभक्षी कायदे हे लक्ष्य आहे. हे कायदे लागू राहिल्यामुळे शेतकऱ्यांची वाताहत झाली. १८ जून ५१ रोजी झालेल्या पहिल्या घटना दुरुस्तीमुळे हे कायदे राबविता आले. सुमारे चार लाख शेतकऱ्यांना आत्महत्या करावी लागली म्हणून १८ जून हा दिवस किसानपुत्र आंदोलनाच्या वतीने शेतकरी पारतंत्र्य दिवस म्हणून पाळला जातो. पहिल्यांदा २०१८ साली मुंबईला पहिला कार्यक्रम झाला. पुढच्या वर्षी पुण्यात झाला. २०२० ला लॉकडाऊन असल्यामुळे कार्यक्रम होऊ शकला नाही. याही वर्षी कार्यक्रम होणार नाही पण वैयक्तिकरित्या किसानपुत्र काळ्या फिती लावून हा दिवस स्थानिक पातळीवर यशस्वी करणार आहेत.

(लेखक बीड जिल्ह्यातील ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

# एका दानशूर नेत्याचे जाणे

**डोंगरपट्यातील रांगडे व्यक्तीमत्व म्हणून प्रसिद्ध असलेले धारूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे विद्यमान सभापती महादेव बडे यांचे रविवारी पहाटे निधन झाले. त्यांचे जाणे भाजपासाठी मोठी पोकळी निर्माण करणारी आहे. त्यानिमित्ताने महादेव बडे यांची 'वर्तमान'ने घेतलेली विशेष मुलाखत पुन:र्मुद्रित करीत आहोत.**



'नेकी कर दरिया में डाल' या ओळीप्रमाणे प्रार्थनेला जोडलेल्या हजारो हातांपेक्षा मदतीला धावून आलेला एक हात अधिक श्रेष्ठ असतो, हे कृतीतून दाखवून देणारे महादेव बडे यांनी आजवर शेकडो गोरगरिबांना आधार दिला. मदत करणे हे महादेव बडे आपलं कर्तव्य मानतात. आज समाजकारण, राजकारण आणि उद्योग क्षेत्रात आपला दबदबा निर्माण करणाऱ्या महादेव बडे यांना गोरगरीब 'अण्णा' या नावाने आदर करतात, आपला माय-बाप समजतात. धारूर तालुक्यातील कासारी-बोडखा येथे बाबन बडे यांच्या पोटी जन्म घेतलेल्या महादेव बडे यांनी अतोनात गरिबी पाहिली आहे. केवळ चार एकर कोरडवाहू जमीन, आई दिव्यांग आणि वडीलांना आलेले अंधत्व अशा प्रतिकूल परिस्थितीत महादेव बडे वाढले. आज माजी जिल्हा परिषद सदस्य आणि विद्यमान धारूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती म्हणून बडे यांचा नावलौकिक असला तरी त्यांचा जीवनप्रवास सर्वानाच अचंबित करणारा आहे. दुसऱ्याच्या शेतावर शेतमजुरी करून त्यांनी प्रारंभी आपला उदरनिर्वाह भागविला. काहीकाळ मुंबईच्या तुर्भे नाक्यावर हमाली केलेली आहे. तर आंबेवडगाव येथील मेव्हणे बाबाराया घोळवे यांच्याकडे मुनीम म्हणून काम केले आहे. ऊस तोडणीचे काम करत असताना मुकादमकीकडे ते वळले आणि मागे वळून पाहिले नाही. अमाप कष्ट उपसण्याची तयारी आणि प्रामाणिकपणाच्या जोरावर आजमितीला ग्रुपमध्ये १२० ते १५० पर्यत ऊसतोड कामगारांच्या टोळ्या आहेत. मुलगा सदाशिव बडे हे सतिश शुगर्स या कर्नाटकातील कारखान्यात अधिकारी आहेत. जवळजवळ दीड दशक सतिश शुगर्शचे चेअरमन तथा कर्नाटक राज्याचे माजी मंत्री सतिश झारके यांचे जिव्हाळ्याचे संबंध आजही टिकून आहेत.

शेतमजुरीपासून सुरू झालेला महादेव बडे यांचा प्रवास प्रेरणादायी आहे. स्वकष्टातून त्यांनी सर्वकाही निर्माण केले आहे. दहा ते बारा स्वतःच्या मालकीचे वाहने आहेत. किमान शंभर गोरगरिबांना मुकादम करून त्यांच्या जीवनात प्रगतीचे द्वार खुले करून दिले. गोरगरिबांच्या अडीअडचणी धावून जाणे हे महादेव बडे यांचे पहिले प्राधान्य असते. लग्न आणि इतर सुख-दुःखाच्या प्रसंगी महादेव बडे अनेकांच्या हाकेला धावून गेले आहेत. केलेल्या मदतीची कुठेही वाच्यता करू नका असे बडे गरजवंतांना सांगतात. अशा या दानशूर व्यक्तीमत्वाला कासारी-बोडखा आणि डोंगरपट्यात 'अण्णा' या आदराच्या नावाने संबोधतात. दोन वर्षापूर्वीच्या दुष्काळात कासारी ग्रामस्थांना मोफत टँकरने पाणीपुरवठा केला. तर याच आठवड्यात तब्बल अडीच लाख रूपये खर्च करून गावात विद्युत डिपी बसविली आहे, अशी माहिती महादेव बडे यांनी वर्तमानशी बोलताना दिली.

### पंकजा मुंडेंचा आदेश मान्य

कासारी ग्रामपंचायतीपासून राजकारणाची पायरी चढलेले महादेव बडे आज तालुक्यातील किंबहुना जिल्ह्यातील भाजपचे ज्येष्ठ नेते आहेत. भोगलवाडी गटातून जिल्हा परिषद सदस्य म्हणून त्यांची कारकीर्द प्रभावी ठरलेली आहे. आठ वर्ष कासारी-बोडखा सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन म्हणून कार्यरत आहेत. माजी केंद्रीय मंत्री तथा लोकनेते दिवंगत गोपीनाथराव मुंडे यांचे निकटवर्तीय असलेले महादेव बडे भाजपचे निष्ठावंत नेते आहेत. आज राजकारणात अजिबात रस नाही अशी प्रांजळ कबुली बडे यांनी वर्तमानशी बोलताना दिली, मात्र लोकनेत्या पंकजा मुंडे जो आदेश देतील तो आपणास मान्य राहील असेही राजकीय वक्तत्व महादेव बडे यांनी केले होते.

निमित्त

**बाबा श्रीहरी देशमाने**

## बहुआयामी व्यक्तिमत्व

# गिरीश कर्नाड

विशेष

एक समकालीन अभिनेते, नाटककार आणि लेखक असे बहुआयामी व्यक्तिमत्व गिरीश कराड यांचा जन्म १९ मे १९३८ रोजी माथेरान येथील एका कोकणी कुटुंबात झाला. त्यांचे मूळगाव कर्नाटकातील दक्षिण कन्नड जिल्ह्यातील 'कार्नाड' हे आहे. या बहुभाषिक व्यक्तिमत्त्वाने चार दशकांहून अधिक काळ नाटक व चित्रपटांमध्ये भूमिका केल्या. त्यांच्या जन्मदिवसानिमित्ताने आपण या अभिनेत्याबद्दल सहसा माहित नसलेल्या गोष्टी पाहूयात. कर्नाड यांना आपण त्यांच्या नाट्यक्षेत्रातील कार्याबद्दल ओळखत असलो तरी, त्यांना सुरुवातीला कवी होण्याची इच्छा होती. टी.एस. इलियट यांच्यासारख्या कवी होण्याची त्यांची इच्छा होती आणि म्हणूनच ते उच्च शिक्षणासाठी परदेशात गेले. ऑक्सफोर्ड विद्यापीठात रोड्सचा अभ्यासक म्हणून या अभिनेत्याने तत्वज्ञान, राजकारण आणि अर्थशास्त्राचा अभ्यास केला. थिएटरवरील प्रेमाने त्यांना परत भारतात परत आणले व त्यांनी काही अत्यंत नाट्यमय नाट्यकृती लिहिल्या. कर्नाड यांना महाभारतातील पात्रांवर आधारित ययाती या त्यांच्या पहिल्या नाटकासाठी तात्काळ यश मिळाल्यांनतर त्याचे इतर अनेक भाषांमध्ये अनुवाद केले गेले.

कर्नाड यांचे सर्वात प्रसिद्ध नाटक तुघलक आहे, ज्याने त्यांना आपल्या देशातील सर्वात आशादायक नाटककार बनविले. कर्नाड आपल्या नाटकांमधील समकालीन मुद्द्यांचा सामना करण्यासाठी इतिहास आणि पुराणकथा वापरतात. अरे, आणि मालगुडी डेज या लोकप्रिय टीव्ही मालिकेमध्ये त्यांचा कार्यकाळ कोणीच विसरणार नाही. आर.के.नारायण यांच्या कादंबरीवर आधारित या कार्यक्रमात स्वामीच्या वडिलांची भूमिका साकारण्यासाठी कर्नाड यांना ओळख मिळाली. मालगुडी डेज हा त्या काळातला प्रसिद्ध कार्यक्रम होता आणि टायटल ट्रॅक आणि संबंधीत पात्रांबद्दल अजूनही त्यांना प्रेमाने आठवले जाते. कर्नाड यांच्या साहित्यातील अपवादात्मक कार्याबद्दल, त्यांना ज्ञानपीठ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्यांना पद्मश्री आणि पद्मभूषण पुरस्कारानेदेखील सन्मानित करण्यात आले होते. कर्नाड यांनी देशाचे माजी राष्ट्रपती एपीजे अब्दुल कलाम यांच्यासाठी आवाज दिला आहे. कलाम यांचे आत्मचरित्र विंग्स ऑफ फायर ऑडिओबुकमध्ये बदलण्यासाठी त्यांनी आवाज दिला आहे.



**टी.एस. इलियट यांच्यासारख्या कवी होण्याची त्यांची इच्छा होती आणि म्हणूनच ते उच्च शिक्षणासाठी परदेशात गेले. ऑक्सफोर्ड विद्यापीठात रोड्सचा अभ्यासक म्हणून या अभिनेत्याने तत्वज्ञान, राजकारण आणि अर्थशास्त्राचा अभ्यास केला.**

# कोरोना रोखण्यासाठी दहा पथके

## माजलगाव पंचायत समितीची मोहीम; गटविकास अधिकारी देतात दररोज गावांना भेटी

▶ प्रतिनिधी

माजलगाव : ग्रामीण भागात वाढता कोरोना प्रादुर्भाव रोखण्यासाठी पंचायत समितीच्या वतीने दहा पथके नेमून गावात जाऊन परिस्थितीचा आढावा घेतला जात असून उपाययोजना केली जात आहे. गटविकास अधिकारी प्रज्ञा माने-भोसले ह्या स्वतः नियमित दररोज पाच ग्रामपंचायतला भेट देत आहेत. यामुळे ग्रामीण भागात याचा परिणाम चांगला होत असल्याचे दिसत आहे.

माजलगाव तालुक्यात ग्रामीण भागात कोरोनाचा वाढता प्रादुर्भाव रोखण्यासाठी धडक मोहीम हाती घेण्यात आली असून गटविकास अधिकारी प्रज्ञा माने-भोसले ह्या दररोज पाच ग्रामपंचायतीला कोविड- १९ संदर्भात प्रत्यक्ष भेट देतात व परिस्थितीची पाहणी करून उपाययोजाना केली जात आहे. नागरिकांत ग्रामपंचायतमार्फत जनजागृती केली जात असून पंचायत समितीमार्फत एकूण १० पथके स्थापन करण्यात आली आहेत. हे पथक प्रत्येकी ५ प्रमाणे ५० ग्रामपंचायतीला दररोज भेट देत आहेत. यात गटविकास अधिकारी यांच्याही पथकाचा समावेश असून त्याही नियमित पाच ग्रामपंचायतीला भेट देतात. अशा दहा पथके मिळून एकूण पन्नास ग्रामपंचायतीला दररोज भेटी देत आहेत. लॉकडाऊनची कडेकोट अमलबजावणी बद्दल सूचना देवून गावातील परीस्थितीची पाहणी करून इतर मार्गदर्शन केले जात आहे. नागरिकांत जनजागृती केली जाते. याचा परिणाम ग्रामीण भागात चांगला होत असून कोरोना प्रादुर्भाव रोखण्यास मदत होत आहे.

### पथकात ३० जणांचा समावेश

कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी माजलगाव तालुक्यातील संपूर्ण १२ गणात प्रत्येक गावात जावून ही १० पथके जनजागृती करत आहेत. या पथकात गटविकास अधिकारी यांच्यासह गटशिक्षणाधिकारी, विस्तार अधिकारी ५, पंचायत समितीतील कर्मचारी २० आदींसह अशा एकूण ३० जणांचा समावेश असल्याची माहिती गटविकास अधिकारी प्रज्ञा माने- भोसले यांनी वर्तमानशी बोलताना दिली.





# विजेच्या धक्क्याने मायलेकींचा करूण अंत

## किट्टीआडगाव येथील ऱ्हदयद्रावक घटना

▶ प्रतिनिधी

माजलगाव : तालुक्यातील किट्टीआडगाव येथे रविवारी सकाळी घरात विद्युत प्रवाह उतरल्याने मायलेकीचा जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. शशिकलाबाई शंकरराव फपाळ (वय ६५) आणि सखुबाई फपाळ (वय ४५) असे मृत मायलेकीचे नाव आहे.



शशिकलाबाई फपाळ



सखुबाई फपाळ

याबाबत अधिक माहिती अशी की, किट्टीआडगाव येथील पाटील गल्ली येथे शशिकलाबाई शंकरराव फपाळ या मुलगी सखुबाई सोबत राहत. रविवारी सकाळी ६ वाजता झोपेतून उठल्यानंतर शशिकलाबाई यांचा हात भिंतीला लागला असता त्यांना तीव्र विद्युत प्रवाहाचा धक्का बसला. यावेळी मुलगी सखुबाई आईला काय झाले हे पाहण्यासाठी गेली असता तिला देखील तीव्र विद्युत प्रवाहाचा धक्का बसला. यात दोघी मायलेकी हिरपळून जागीच ठार झाल्या. दरम्यान, पाटील गल्ली येथे मागील दहा दिवसांपासून अनेक घरात विद्युत प्रवाह उतरला असल्याच्या तक्रारी ग्रामस्थांनी महावितरणकडे केल्या होत्या. परंतु, संबंधित अधिकाऱ्यांनी याकडे लक्ष न देता दुर्लक्ष केले. यातूनच ही घटना घडली असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

# शेतकऱ्यांसाठी प्रहारचे थाळी बजाओ आंदोलन



▶ प्रतिनिधी

माजलगाव : केंद्र सरकारने उडीद, तूर, मुगाची आयात थांबवावी या मागणीसाठी तसेच केंद्र सरकारच्या धोरणाचा निषेध म्हणून प्रहार जनशक्ती पार्टीच्या वतीने येथील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकात थाळी वाजवून आंदोलन करण्यात आले.

पक्षाचे संस्थापक अध्यक्ष तथा राज्यमंत्री बच्चू कडू यांनी दोन दिवसांपूर्वी थाळी बजाओ आंदोलनाचा इशारा दिला होता. त्या अनुषंगाने हे आंदोलन करण्यात आले. यावेळी प्रहार जनशक्ती पक्षाचे तालुकाप्रमुख गोपाळ पैंजणे उपतालुकाप्रमुख नितीन कांबळे, शहरप्रमुख मुस्ताक कुरेशी, तालुक संघटक अमर कान्हापूरकर, युवक शहराध्यक्ष अमोल ढगे, युवक तालुक प्रमुख संभाजी इदगे पाटील, सोशल मीडिया तालुकाप्रमुख अशोक अर्जून आदी उपस्थित होते.



## तांबवे कुटुंबियांना पंचायत समितीचा आधार

▶ प्रतिनिधी

माजलगाव : तालुक्यातील पात्रुड येथील एकल महीलेस उदरनिर्वाह करण्यासाठी शुक्रवारी पिठाची चक्की खरेदीसाठी धनादेशाचे वाटप पंचायत समितीमार्फत उपसभापती डॉ.वसिम मनसबदार यांच्या हस्ते करण्यात आले.

पात्रुड येथील ऊसतोड कामगार लहु तांबवे यांचे काही महिन्यांपूर्वी ऊसतोडणी करताना निधन झाले होते. त्यांच्या निधनाने घरातील कमावता माणुस गेल्याने त्यांच्या कुटुंबावर उपासमारीची वेळ आली होती. त्यांच्या मागे कुटुंबाची जबाबदारी त्यांची पत्नी दीपिका लहु तांबवे यांच्यावर आली. पिठाची चक्की खरेदीसाठी पंचायत समिती निधीतून ४० हजार रुपये अनुदान देण्यात आले.

# धारूर तालुक्यात नियम मोडणाऱ्यांना दंड

## पंचायत समितीची धडक कारवाई; सहा पथकांची नियुक्ती

▶ प्रतिनिधी

धारूर : जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार, धारूरचे गटविकास अधिकारी राजेश्वर कांबळे यांच्या सूचनेनुसार तालुक्यातील सर्वच गावात लॉकडाऊनला चांगला प्रतिसाद मिळावा यासाठी या सर्व ६ गणात पथक नेमून जनजागृती व दोषींवर दंडात्मक कार्यावाही केली जात आहे. मोहखेड गणात प्रमुख बी.एन.आगळे, कृषी विस्तार अधिकारी व सर्व ग्रामसेवक, सरपंच, अंगणवाडी सेविका, आशावर्कर आदींनी संपूर्ण तालुक्यात फिरून जनजागृती करत आहेत.

धारूरचे गटविकास अधिकारी यांनी दि.१५ मे २३ मेपर्यंत प्रति दिन ७ ग्रामपंचायत प्रमाणे पूर्ण तालुका पिंजून काढला आहे. यामध्ये ग्रामसेवक, आशावर्कर, अंगणवाडी सेविका, ग्रा.प.कर्मचारी यांचा मोलाचा सहभाग त्यांना लाभत आहे. गटविकास अधिकारी राजेश्वर कांबळे यांनी फकिर जवळा, चिखली, देवठाणा, मुंगी, कान्नापूर, मोहखेड, कोयाळ व सर्व तालुक्यात सहा पथके नेमून जनजागृती करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे गावंदरा, तेलगाव, चिखली, हिंगणी, रुईधारूर, अंजनडोह येथे रविवारी दंडात्मक कार्यवाही करून दहा हजार रूपये दंड वसुली केली आहे. ही कारवाई किराणा दुकान, मटण दुकान, हॉटेल्स अशा विविध दुकानांवर करण्यात आली आहे.





### पथकांकडून कोरोना जनजागृती : बी.एन.आगळे

धारूर तालुक्यातील मोहखेड, जहागिरमोहा, भोगलवाडी, तेलगाव, आसरडोह या सहा गणात वेगवेगळी पथके जनजागृती करत आहेत. शासनाचे नियम तोडणाऱ्या दुकानदारांवर कारवाई करत असल्याची माहिती मोहखेड गण पथक प्रमुख बी.एन.आगळे यांनी सांगितले.

### प्रज्ञा मानेंकडून 'वर्तमान'चे कौतुक



माजलगाव : पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी प्रज्ञा माने 'वर्तमान'च्या अंकाचे वाचन करताना. दर्जेदार अंक निघत असल्याने वर्तमान टीमचे माने यांनी कौतुक केले.

# 'पल्स'कडून रूग्णसेवा व्हावी

## डॉ.प्रकाश आनंदगावकर यांचे प्रतिपादन

▶ प्रतिनिधी

माजलगाव : कोरोना संक्रमण काळात ग्रामिण भागात वैद्यकीय सेवेचा शुभारंभ करून डॉ. तौसिफ शेख यांनी एक धाडसी व स्वागतार्ह निर्णय घेतला आहे. त्यांच्या हातून रूग्णसेवा घडो असे गौरवोद्गार डॉ.प्रकाश आनंदगावकर यांनी व्यक्त केले. गुरूवारी पात्रुड येथे पल्स हॉस्पिटल उद्घाटना प्रसंगी ते बोलत होते.



माजलगाव तालुक्यातील पात्रुड येथील रहिवाशी डॉ.तौसिफ शेख यांनी कोल्हापुर येथील वैद्यकीय महाविद्यालयातून एम.बी.बी.एस.ची पदवी प्राप्त करून घाटी हॉस्पिटल, औरंगाबाद, नासिक येथील एका नामांकित एसएमबीटी महाविद्यालय व हॉस्प्टिल, ग्रामिण रूग्णालय इगतपूरी, जिल्हा नाशिक येथे वैद्यकीय अधिकारी म्हणून सेवा दिली. दरम्यान पात्रुड येथील प्राथमिक आरोग्य केंद्र (पीएचसी) येथे वैद्यकीय अधिकारी म्हणून कांही काळ काम केल्यानंतर पुणे, मुंबई सारख्या मेट्रोसिटी कडे न जाता ग्रामिण क्षेत्राशी आपली नाळ जोडत आपल्या वैद्यकीय सेवेचा ग्रामिण भागात लाभ देण्यासाठी मूळ गावी पात्रुड येथे स्वत:चा दवाखाना स्थापन केला. याचा गुरूवार, २० मे रोजी सकाळी मान्यवरांच्या उपस्थितीत शानदार शुभारंभ झाला. याप्रसंगी कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून प्रख्यात सर्जन डॉ. प्रकाश आनंदगावकर हे होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजलगाव ग्रामीण रूग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ.सुरेश साबळे हे होते.

पंचायत समितीचे उपसभापती डॉ.वसिम मनसबदार, सरपंच ॲड.कजिम मनसबदार आदींसह मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी माजलगाव ग्रामीण रूग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ.सुरेश साबळे यांनी डॉ.तौसीफ शेख यांच्या वैद्यकीय सेवेस शुभेच्छा दिल्या. सध्या लॉकडाऊन सुरू असल्याने कोविड -१९ नियमांचे पालन करीत पल्स हॉस्पिटल चा शुभारंभ पार पडला. दरम्यान दिवसभरात मान्यवरांनी दवाखान्याला भेटी देवून शुभेच्छा दिल्या.

पल्स हॉस्पिटलच्या शुभारंभाप्रसंगी तालुका आरोग्य अधिकारी डॉ.मधुकर घुबडे, डॉ.यशवंत राजेभोसले, डॉ.श्रेयश देशपांडे, डॉ.विजय खळगे, डॉ.युवराज कोल्हे, डॉ.सचिन डक, डॉ.रंगनाथ गोळेकर, डॉ.शाहनवाज अत्तार, डॉ.अरबाज काजी, डॉ.शोएब शेख, डॉ.मुमताज, डॉ.सुनिल गरड, मुख्तार मोमीन, पंचायत समितीचे माजी उपसभापती मोमीन लतिफ, सिद्दीकी सलीमुल्लाह, सेवानिवृत्त नायब तहसीलदार रहेबरोद्दीन शेख, सेवानिवृत्त आदर्श शिक्षक वासेफोद्दीन शेख, जहुरोद्दीन शेख, यूफ्लेक्स लिमिटेड केमिकल बिजनेस कंपनी, चे विभागीय सेल्स मॅनेजर अफ्रोज अहमद, एमएसबीचे वरिष्ठ तंत्रज्ञ वजाहत अहमद आदींची उपस्थिती होती.



# कोरोना काळात आरोग्य यंत्रणा अधिक सक्षम करण्याची गरज

## सन्मित्र मित्र मंडळाची मागणी

▶ प्रतिनिधी

बीड : जिल्ह्यातील कोरोना रूग्णांच्या बाबत गंभीर परिस्थिती निर्माण झाली असून ही परिस्थिती निर्माण होण्यास जिल्हा आरोग्य यंत्रणेचा भोंगळ आणि गलथान कारभारच जबाबदार आहे. पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी यामध्ये जातीने लक्ष घालून आरोग्य यंत्रणेचा अनागोंदी कारभार थांबवण्यासाठी तातडीची बैठक घ्यावी, अशी मागणी सन्मित्र मित्र मंडळाचे अध्यक्ष हिमांशू देशमुख यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

सध्या कोविड-१९ च्या दुसऱ्या लाटेने थैमान घातले असून राज्यातील इतर जिल्ह्यांनी मात्र हाताबाहेर चाललेली परिस्थिती आटोक्यात आणल्याचे आकडेवारी वरून निदर्शनास येत आहे. परंतु याच्या अगदी उलट परिस्थिती सध्या बीड जिल्ह्यातील कोरोना रूग्णांच्या बाबत दिसून येत आहे. बीड जिल्ह्यात दिवसेंदिवस कोरोना रूग्णांचा आकडा वाढतच आहे, गेल्या १६ दिवसांत ३२५ मृत्यूचा आकडा असून हि परिस्थिती गंभीर बनली आहे. या सर्व गंभीर परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी तात्काळ जातीने लक्ष घालण्याची वेळ आता आली असून तातडीने जिल्ह्या आरोग्य यंत्रणेच्या भोंगळ आणि गलथान कारभारा संबंधी स्वतः उपस्थित राहून बैठक घ्यावी आणि संबंधित अधिकाऱ्यांवर कठोरातील कठोर कार्यवाही करून जिल्ह्याचा आढावा दौरा करून जिल्ह्यातील गोरगरीब जनतेला मायबाप सरकार आपल्या सोबत असल्याचा धीर द्यावा अशी विनंती वजा मागणी सन्मित्र मित्र मंडळाचे अध्यक्ष हिमांशू देशमुख, उपाध्यक्ष कृष्णा थोरात, सचिव चिंतेश जोशी, सुयोग पोतदार, अमोल रत्नपारखे आदींनी निवेदनाद्वारे केली आहे.

# लसीकरण केंद्रावर सुविधा

## बाजार समितीने मंडप थाटला; शुद्ध पाण्यासह नाश्ताची सोय

माजलगाव : कोरोना प्रतिबंधित लस घेण्यासाठी भर उन्हात ग्रामीण रूग्णालयात नागरिकांच्या रांगा लागल्या आहेत. या नागरिकांना मंडपद्वारे सावलीसह पाणी नाश्त्याची सोय सोय करण्यात आली आहे. माजलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती संभाजी शेजुळ यांनी माणुसकीच्या भावनेतून हा पुढाकार घेतला आहे.

कोरोना प्रतिबंधक लस घेण्यासाठी शहरातील ग्रामीण रूग्णालयात त्याचप्रमाणे तालुक्यातील पाचही प्राथमिक आरोग्य केंद्रावर लस घेण्यासाठी रांगा लागत आहेत. या ठिकाणी सावली व पाण्याची सोय नसल्याचे लक्षात येताच माजलगाव बाजार समितीचे सभापती शेजूळ यांनी या ठिकाणी मंडप उभारला आहे. तसेच थंड पाण्याचे जार उपलब्ध केले असल्याने लस घेण्यासाठी येणाऱ्या नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

### बाजार समितीने उचलला खारीचा वाटा : सभापती संभाजी शेजुळ



लस घेण्यासाठी कडाक्याच्या उन्हात नागरिकांच्या रांगा लागल्या आहेत. याठिकाणी नागरिकांचे होणारे हाल टाळण्यासाठी बाजार समितीने छोटासा प्रयत्न केला असून त्यांच्या डोक्यावर सावलीसाठी मंडप आणि पिण्याच्या पाण्याची सोय उपलब्ध केली आहे. गरजेनुसार याठिकाणी आम्ही चहा नाश्ताही पुरवणार आहोत, असे माजलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती संभाजी शेजुळ यांनी सांगितले.



माजलगाव : लसीकरण केंद्रासमोर येणाऱ्या नागरिकांसाठी सोयीसाठी उभारलेला मंडप.

# प्रलंबित विकासकामे पूर्ण करा : नारायण मेंडके

माजलगाव : शहरातील प्रभाग क्रमांक तीन मधील कालिंकानगर, जिजामातानगर, अशोकनगर मधील प्रलंबित असलेले विकासकामे त्वरितपूर्ण करण्याची मागणी नारायण मेंडके यांनी नगरपालिकेकडे निवेदनाद्वारे केली आहे.

सिमेंट रस्ते, मध्यभागी लोखंडी पाईपलाईन नाली व नाली वरचे पुलाचे कामे करण्यात यावीत. तसेच मागील तीन महिन्यांपासून कचरा गाडी येत नाही. कामे बऱ्याच वर्षापासून प्रलंबित आहे. त्यामुळे नगरपालिकेने प्रलंबित विकासकामे त्वरीत करावीत, असे म्हटले आहे. या निवेदनावर नारायण मेंडके, ज्ञानेश्वर पवार, रवि गायकवाड, आकाश पवार, गोविंद राजपूत, दत्ता जाधव जकी इनामदार, भैय्या हुलजुते, सागर शहाणे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# शेतकऱ्यांसाठी पालकमंत्री सरसावले

## खरीप हंगामासाठी नाबार्डकडे केली ३०० कोटींची मागणी

प्रतिनिधी

पुणे : बीड जिल्ह्यातील शेतकरी कोरोना आणि महागाईमुळे त्रस्त आहेत, खरीप हंगामाच्या पूर्वतयारी साठी त्यांना पतपुरवठा करण्याची आवश्यकता आहे, बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या माध्यमातून जिल्ह्यातील पात्र शेतकऱ्यांना पीककर्ज वाटप करण्यासाठी नाबार्ड कडून ३०० कोटी रुपयांची फेरकर्ज मर्यादा मंजूर करावी अशी मागणी पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी केली. त्यांनी बँकेच्या प्रशासकीय मंडळासह नाबार्डच्या अधिकाऱ्यांची भेट घेतली, यावेळी माजी आमदार अमरसिंह पंडित उपस्थित होते.





बीड जिल्हा बँकेला जिल्ह्यातील शेतकऱ्यांना पीक कर्ज वाटपासाठी ३०० कोटी रुपये नाबार्डकडून फेरकर्ज उपलब्ध करावे या मागणीसाठी बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी शुक्रवार दि.२१ मे रोजी पुणे येथील नाबार्डच्या कार्यालयात बैठक घेतली. यावेळी माजी आमदार अमरसिंह पंडित, बँकेच्या प्रशासकीय मंडळाचे अध्यक्ष अविनाश पाठक, सदस्य अशोक कदम, अशोक कवडे यांचेसह नाबार्डचे मुख्य सरव्यवस्थापक एल.एल.रावल, रावत, व्यवस्थापक रश्मी, श्रीनिवास यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते. या बैठकीत जिल्हा बँकेच्या वतीने नाबार्डला फेरकर्ज मागणी प्रस्ताव सादर करण्यात आला. बँकेची आर्थिक परिस्थिती आणि संकटकाळात शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी हा प्रस्ताव मंजूर करण्याची मागणी पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी केली. नाबार्डच्या वतीने मुख्य सरव्यवस्थापक रावल यांनी बँकेच्या प्रस्तावबाबत सत्वर कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले. राज्य सहकारी बँकेकडून तात्काळ प्रस्ताव मागविण्यात येईल असेही सांगितले.बीड जिल्ह्यातील सर्वाधिक शेतकरी बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला जोडलेले आहेत, शासनाने बँकेला २६० कोटी रुपयांचे कर्ज वाटपाचे उद्दिष्ट दिले आहे. मात्र यावर्षी कोरोनाच्या महामारीत शेतीची अर्थव्यवस्था कोलमडून गेल्याने आणि केंद्र सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे वाढलेल्या महागाईसारख्या संकटामुळे शेतकरी त्रस्त झाला आहे, त्याला आधार देण्यासाठी यावर्षी उद्दिष्टांपेक्षा अधिक पीक कर्ज वाटपाचे नियोजन करण्याच्या सूचना पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी दिल्या होत्या. जिल्हा बँकेने राज्य सहकारी बँकेकडे यापूर्वी २०० कोटी रुपये फेरकर्ज मर्यादा नाबार्डच्या हिश्यातून मंजुरीचा प्रस्ताव सादर केला, मात्र पूर्वीच्या संचालक मंडळाने सुमारे १६८ कोटी रुपयांच्या ठेवी वाटप केल्यामुळे बँकेचा सिडी रेशोचे प्रमाण वाढल्याने पतपुरवठा होण्यास अडचणी आल्या. याबाबत माहिती मिळताच पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी तात्काळ राज्य सहकारी बँक आणि नाबार्डच्या अधिकाऱ्यांना संपर्क साधून माहिती घेतली होती. जिल्ह्यातील पात्र शेतकऱ्यांना पीककर्ज मिळाले पाहिजे या भूमिकेतून त्यांनी आज नाबार्ड मध्ये बैठक घेतली. पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या मागणीला नाबार्ड आणि राज्य सहकारी बँकेच्या अधिकाऱ्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. जिल्हा बँकेने खरीप हंगामाचे पीककर्ज वाटप केले असून शेतकऱ्यांनी कागदपत्रांची पूर्तता करून कर्ज मागणी करण्याचे आवाहन त्यांनी केले आहे.



# जयसिंग सोळंके धावले रूग्णांच्या मदतीला

## दररोज १ हजार डब्यांचे वितरण

प्रतिनिधी

माजलगाव : तालुक्यात रोज ५० ते १०० कोरोनाग्रस्त रूग्ण आढळून येत आहेत. हे रूग्ण शहरातील कोविड केअर सेंटर व हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल आहेत. त्यांच्यासह नातेवाईकांसाठी सेंटरमध्ये उपचार घेत असलेल्यांना मदत म्हणून बीड जिल्हा परिषदेचे बांधकाम सभापती जयसिंग सोळंके यांच्या पुढाकारातून गेल्या १६ मे पासून दोन वेळेचे मोफत जेवण देण्यात येत आहे. एक हजार डब्यांतून हे जेवण गरजूंपर्यंत पोहोचवले जात आहे.



कोरोना साथीने थैमान घातल्याने रूग्ण व नातेवाईकांची या ठिकाणी जेवण्यासाठी फरफट होत होती. ही फरफट थांबविण्यासाठी बीड जि.प.चे बांधकाम सभापती तथा राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष जयसिंग सोळंके हे कोरोना साथीत धावून आले आहेत. माजलगाव मतदार संघातील माजलगाव, वडवणी, धारूर तालुक्यातील ग्रामीण भागातील जनतेसाठी डब्बे उपलब्ध करून देण्यात येत आहेत. उपक्रमाच्या यशस्वितेसाठी विजय शिंदे, शंतनू सोळंके, प्रशांत शेटे, किशोर देशमुख, शाम सोळंके, सचिन झगडे, कृष्णा रूद्रवार, अल्ताफ मिर्झा यांच्यासह कार्येकर्ते परिश्रम घेत आहेत.





# नियमांचे उल्लंघन; दुकानदारांवर कारवाई

प्रतिनिधी

माजलगाव : लॉकडाऊन असतांनाही शहरात मोठ्या प्रमाणात दुकाने सुरू आहेत. अनेकवेळा सांगुनही ऐकत नसलेल्या तीन दुकानांवर शुक्रवारी पोलीस निरीक्षक धनंजय फराटे यांनी कारवाई करत तीन दुकाने सिल केली. शहरात लॉकडाऊन असताना व पोलिसांनी मागील आठवड्यात सर्व व्यापाऱ्यांची बैठक घेऊन सर्व व्यापाऱ्यांनी सहकार्य करावे असे आवाहन केले होते. तरीही फायदा होत नसल्याने शुक्रवारी दुपारी नवीन बसस्थानकासमोरील भागात सुरू असलेल्या वैजनाथ पांडुरंग नाईकनवरे यांच्या मालकीचे बेकरी, केकचे दुकान गणेश सुभाष थळकर यांचे ज्यूस सेंटर व भोजनालय सुरू होत्या.

पोलीस निरीक्षक धनंजय फराटे यांनी ही दुकाने सिल केली. तर मार्च महिन्यात दोन दुकानांवर पोलीसांनी गुन्हे दाखल केले होते. कारवाईच्या वेळी सपोउनि निता गायकवाड, पो.कॉ. तळेकर, पो.कॉ. ठेगल, नगरपालिकेचे कर्मचारी भारत मिसाळ आदी होते.

# नित्रुड ते गुजरवाडी रस्त्याचे काम पूर्ण

## संभाजी ब्रिगेडच्या पाठपुराव्याला यश; ग्रामस्थांची त्रासातून सूटका

प्रतिनिधी

नित्रुड : मागील अनेक दिवसानी रखडलेल्या गुजरवाडी ते नित्रुड या तीन किमी अंतराचे अखेर डांबरीकरण अंतिम टप्यात आले आहे यासाठी संभाजी ब्रिगेडचे माजलगाव तालुका कार्याध्यक्ष नितीन येवले यांनी गुजरवाडीतील अनेक तरुणांना सोबत घेवुन तहसील व सार्वजनिक बाधकाम विभाग याच्याकडे वेळोवेळी पाठपुरावा करुन वेळोवेळी अधिकार्याच्या मागे तगादा लावून आखेर रस्त्याचे काम अंतिम टप्यात नेले आहे आता रस्त्याचे काम पुर्ण होत आहे.



तरी गुजरवाडीतील ग्रामस्त अनेक दिवस या रस्त्याला घेवुन त्रस्त होते परंतु रस्त्याचे काम आता अंतिम टप्यात आहे त्यामुळे अनेक नागरिक समाधानी झालेच्या प्रतिक्रिया नागरिकान कडुन मिळत आहेत यासाठी संभाजी ब्रिगेडचे नितीन येवले यांचे व सर्व सहकारी यांचे ग्रामस्थाकडुन आभार मानले जात आहेत.






# ग्रामीण भागाची जाण असलेले नेतृत्वः परमेश्वर मुंडे

राष्ट्रीय क्रांती सेना या पक्षाचे संस्थापक अध्यक्ष परमेश्वर मुंडे हे एक ग्रामीण भागाची जाण असलेले नेतृत्व आहे. २२ मे हा मुंडे यांचा वाढदिवस. त्या अनुषंगाने परमेश्वर मुंडे यांचे सामाजिक कार्य आणि त्यांच्या एकंदरीत जीवन कार्यावर 'वर्तमान'ने टाकलेला प्रकाशझोत.

**निमित्त**

**भगीरथ तोडकरी**

किल्लेधारूर तालुक्यातील पहाडीदहीफळ येथील रहिवाशी परमेश्वर मुंडे यांनी राष्ट्रीय क्रांती सेनेच्या माध्यमातून समाजकार्यात सक्रिय सहभाग घेतलेला आहे. २०१४ साली मुंडे यांनी राष्ट्रीय क्रांती सेनेची स्थापना केली. पक्षाच्या माध्यमातून वेळोवेळी शेतकरी आणि गोरगरिबांच्या मदतीला मुंडे धावून गेलेले आहेत. शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवताना कारखानदारांच्या विरोधातही विविध आंदोलने केलेली आहेत.

ऊस, कापूस आणि सोयाबीनसह इतर मालाला योग्य भाव मिळावा यासाठी राष्ट्रीय क्रांती सेनेने वेळोवेळी आंदोलने केली आहेत. शेतकऱ्यांना २४ तास वीज द्यावी ही मागणी



सतत लावून धरलेली आहे. शेतकऱ्यांच्या पीककर्ज प्रकरणाबाबत उदासीन असलेल्या प्रशासना विरोधात लढा उभारला आहे. अंबाजोगाई जिल्हा घोषित करा, यासाठीही परमेश्वर मुंडे रस्त्यावर उतरलेले आहेत. धनगर, बंजारा समाजाचा अनुसूचित जातीत समावेश करावा या मागणीसह वंजारी समाजाला १० टक्के आरक्षण द्यावे, या मागणीसाठी मुंडे यांनी शासन दरबारी लक्ष वेधलेले आहे. शेतकऱ्यांना कर्जासाठी अडवणूक करणाऱ्या बँकांच्या विरोधात आक्रमक पवित्रा घेत परमेश्वर मुंडे यांनी प्रसंगी बँकांना कुलूप ठोकण्याचे काम केलेले आहे. एकंदरीत ग्रामीण भागातील कार्यकर्त्याला केंद्रस्थानी मानून मुंडे यांचे विविध पातळ्यांवर केलेले कार्य निश्चित वेगळे आहे. ग्रामीण भागाची जाण असलेला युवा नेता अशी त्यांची ओळख जिल्हा आणि राज्यात झालेली आहे.





### हेल्पलाईनला मोठा प्रतिसाद

बीड जिल्हा आणि राज्यातील सर्वसामान्य व्यक्तीला कोणतीही अडचण आल्यास त्यासाठी हेल्पलाईन सुरू करू, संपर्क साधण्याचे आवाहन केले होते. त्याला मोठा प्रतिसाद मिळाला, अशी माहिती राष्ट्रीय क्रांती सेनेचे संस्थापक अध्यक्ष परमेश्वर मुंडे यांनी दिली. दिवंगत गोपीनाथराव मुंडे यांच्या मृत्यूबाबत संशयितांची नार्को टेस्ट झाली पाहिजे, ही मागणी शासनाकडे केलेली आहे.

आधुनिक विचारांचे वर्तमान

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि **संपादक : भगीरथ गौरीशंकर तोडकरी,** यांनी तुळजा भवानी पब्लिकेशन ,माजलगाव ता.माजलगाव जि. बीड 431131 (महाराष्ट्र) येथे छापून आधुनिक विचारांचे वर्तमान कार्यालय, 23,मुख्य रस्ता, मस्जिद चौक, माजलगाव ता.माजलगाव जि.बीड येथे प्रसिद्ध केले. ईमेल : vartmaneditor@gmail.com भ्रमणध्वनी : **9423209823** RNI : MAHMAR/2018/76928, अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, लेख, व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद माजलगाव न्यायालय अंतर्गत) Postal REG No : L/92/RNP/Beed/2020-2022.